# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990



Bharat Chandak

SATYA ELECTRICALS

POLYCAB | legrand | HAVELLS | Finolex | KOLORS | USHA | PHILIPS | SIEMENS

Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512

Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018

Email:satyaelectricals@rediffmail.com



लातूर वर्ष ३ रे अंक १०९ वा मंगळवार दि.१२ सप्टेंबर २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख याना भारत जोडोऐवजी स्वतःचे कार्यकर्ते जोडण्याची जास्त गरज



प्रतिनिधी /लातूर :- काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या 'भारत जोडो ' अभियानाच्या वर्षपूर्ती निमित्त आमदार अमित देशमुख यांनी परवा लातूर शहर मतदारसंघांमध्ये भर पावसात भिजत पदयात्रा काढली. परंतु या उपक्रमा निमित्त लातुरात अगदी मार्मिक आणि वास्तव-ला धरून वेगळीच चर्चा झाली. माजी मंत्री, आमदार अमित देशमुखांना भारत जोडोऐवजी स्वतःचे कार्यकर्ते जोडण्याची जास्त गरज आहे, असा सूर उमटला. तळागाळातील लोकांशी नाळ जोडल्याशिवाय लोकनेता होता येत नाही, आणि राजकारणाच्या सारिपाटावर लोक जोडले जाणे ही मोठी ताकद असते. लोकांत मिसळण्याच्या तत्वाचा अवलंब केल्यास सत्ता काबीज करता येते, हा मुद्दा लक्षात घेऊन काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी भारत जोडो अभियान राबवले. त्यातून त्यांनी देशातील सामान्य लोकांना भेटले अन काँग्रेसमधे नव चैतन्य निर्माण झाले. परिणामी देशाला एनडीएच्या विरोधात इंडियाच्या रूपात राजकीय पर्याय मिळाला. येत्या सर्वत्रिक निवडणुकीत याचा फायदा महाराष्ट्रात महाविकास आघाडीला अन देशभरात इंडियाला होईल असा विश्वास काँग्रेसला आहे. लोक जोडण्याला मोठे महत्व असताना लातुरात मात्र आमदार अमित देशमुख यांनी काढलेल्या पदयात्रेत काँग्रेसचे काही निष्ठावान चेहरे पाहायला मिळाले नाहीत. आतापर्यन्त अशा चेहऱ्यांना काँग्रेसने नगरसेवकपासून महत्वाची विविध पदे भूषविण्याची संधी देत राजकीय बस्तान बसविण्याचा प्रयत्न केला. मात्र आता तेच चे-हरे ऐन वेळी विरोधकांशी हातमिळवणी करून आमदार अमित देशमुख यांची डोकेदुखी बनतील का अशी चर्चा दबक्या आवाजात होत आहे. कारण, सध्या महाराष्ट्रामध्ये सत्ता समीकरण बदलत आहे. त्यामुळे ध्रुवीकरण होण्याबरोबरच सत्तेचे विभाजन फार मोठ्या प्रमाणात होत आहे. हि बाब लातूरच्या स्थानिक काँग्रेस नेतृत्वाने लक्ष्यात घेणे गरजेचे आहे. आमदार अमित देशमुख यांच्या आजूबाजूलाही 'एकनाथ' आ-हेत काय? संधी मिळताच ते या तळ्यातून दुसऱ्या तळ्यात उडी मारतील अन आमदारकीचे स्वप्न पाह-तील, असा अंदाजही बांधला जात आहे. आमदार अमित देशमुख अशा चेहऱ्यामागचा तो चेहरा आ-ळखून आगामी फासे कसे टाकणार ? राहुल गांधी यांच्या प्रमाणे ते पण आता कार्यकर्ते अन तळागाळातल्या लोकांशी आपली नाळ घट्ट करणार का असा सवालही या निमित्ताने उपस्थित होत आहे.

वडिलधाऱ्यांचा वारसा जपण्याची गरज

लोकनेते विलासराव देशमुख आणि सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांचा वारसा आमदार अमित देशमुख यांना लाभला आहे. आपल्या वडिलधाऱ्यांचा वारसा जपण्याची गरज आमदार अमित देशमुख यांना आहे. उपरोक्त नेत्यांनी आपली नाळ सामान्य जनतेशी जोडल्याने त्यांना लोकभावना ओळखता येत असत आणि कार्यकर्त्यांची नाडी कळत असत. त्यामुळे विलासरावांनी गल्लीपासून दिल्लीपर्यन्त दीर्घकाळ राजकारण केले. पंचायत समिती ते मुख्यमंत्री व्हाया केंद्रीय मंत्रिपदापर्यंची झेप घेतली. दिलीपराव देशमुख यानीही झेडपीपासून ते राज्याचे कॅबिनेट मंत्रीपद भूषवले. दीर्घकाळ विधानपरिषदेवर आमदारकी मिळवून आपल्या कार्याची छाप सोडली. सहकारी संस्था उत्कृष्ट चालवून सहकारमहर्षी होण्याचा मान मिळवला. या मागे त्यांना लोक भावना ओळखण्याची कला आणि खरे कार्यकर्ते जोडण्याचा गन अवगत होता. त्यामुळे अमित देशमुखांना लोक जोडण्याबरोबरच निष्ठावान कार्यकर्ते आपल्या गोटात जोडावे लागतील, हे मात्र त्रिवार सत्य आहे.

## 'क्रांतिशाली लातूर' चित्ररथाला जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी दाखवली हिरवी झेंडी




लातूर, दि. ११ (जिमाका): मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त जिल्ह्यातील महसूल मंडळांच्या गावांमध्ये चित्ररथाद्वारे मुक्तिसंग्रामाचा जागर होणार आहे. यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाने तयार केलेल्या 'क्रांतिशाली लातूर' या चित्ररथ-ला जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आज येथे हिरवी झेंडी दाखवली.

अपर जिल्हाधिकारी सुनील यादव, निवासी उपजिल्हाधिकारी विजयकुमार ढगे, सामान्य प्रशासनचे उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक, उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सुचिता शिंदे, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, संगीता टकले, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रियांका कांबळे, जिल्हा नियोजन अधिकारी एम. एस. दुशिंग, नगरपालिका प्रशासनचे सहायक आयुक्त रामदास कोकरे यांची उप-स्थिती होती. जिल्हा माहिती अधिकारी युवराज पाटील यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त जिल्हा प्रशासनाच्यावतीने विविध उपक्रम हाती घेण्यात आले आहे. या अंतर्गत मुक्तिसंग्रामावर आधारित चित्ररथाची निर्मिती करण्यात आली असून हा चित्ररथ जिल्ह्यातील महसूल मंडळांच्या गावांमध्ये जाणार आहे. मराठवाडा मुक्तिसंग्रामाचा लढ्यावर आधारित चित्रफित ह्या चित्ररथाद्वारे दाखविण्यात येणार आहे.

## साहित्यकांच्या लेखनीतून दिशाहीन राजकारण्यांना दिशा दाखविण्याचे साहित्य घडावे- माजीमंत्री आ.संभाजी पाटील निलंगेकर

### मुक्तीसंग्रामाच्या इतिहासाचे धडे शालेय अभ्यासक्रमात असावेत

मराठवाड्याला निजामाच्या राजवटीतून मुक्त करण्यासाठी जो संग्राम करण्यात आला होता त्याला मोठा इतिहास आहे. शालेय अभ्यासक्रमात मराठवाडा मुक्ती संग्रामच्या इतिहासाचे धडे समाविष्ट करून मराठवाडा मुक्ती संग्रामच्या इतिहासाची ओळख आगामी पिढीला करून द्यावी अशी मागणी या साहित्य संमेलनाच्या माध्यमातून आ. निलंगेकर यांनी केली. मराठवाडा मुक्ती संग्रामचे औचित्य साधत पहिल्यांदाच मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन केल्याबद्दल आ. निलंगेकर यांनी संयोजकांचे कौतुक करून हा मान निलंगा विधानसभा मतदारसंघाला मिळाल्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त केले.

लातूर/प्रतिनिधीः- साहित्य आणि लेखनीच्या माध्यमातून अनेक क्रांत्या घडलेल्या असून साहित्यामध्ये परिवर्तन करण्याची सुद्धा ताकद आहे. साहित्यांने वेळोवेळी समाज व इतर ठिकाणी घडणार्या घटनांचे विश्लेषन करून सर्वांनाच विचार करण्यास भाग पाडले आहे. सध्या राजकारणात अनेक चढ-उतार होत असून अनेक राजकीय मंडळी दिशाहीन झालेली आहेत. त्यामुळेच साहित्यकांनी आपल्या लेखनीतून दिशाहीन राजकारण्यांना दिशा दाखविण्याचे साहित्य घडवावे अशी अपेक्षा व्यक्त करून माजीमंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी साहित्य संमेलनाच्या माध्यमातून या बाबींवरही परिसंवाद घडवून आणावा असे आव-ाहन केले.

मराठवाडा मुक्तीसंग्रामच्या अमृत महोत्सवाचे औचित्य साधून साहित्य आणि संस्कृती संवर्धन मंडळ व श्री अनंतपाळ नुतन विद्यालय शिक्षण समितीच्या संयुक्त विद्यमानाने शिरुर अनंतपाळ येथील स्वामी रामानंद तीर्थ साहित्य नगरी (मोरया लॉन्स) मध्ये एकदिवसीय मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या साहित्य संमेलनाचे उद्घाटक म्हणून आ. निलंगेकर बोलत होते. यावेळी व्यासपीठावर संमेलनाध्यक्ष धनंजय गुडसूरकर, स्वागताध्यक्ष ॲड. संभाजीराव पाटील तर विशेष अतिथी म्हणून माजी जि.प. अध्यक्ष रामचंद्र तिरुके, प्रसिद्ध व्याख्याते सोमनाथ रोडे, तहसीलदार काशिनाथ पाटील, गटविकास अधिकारी बी.टी.चव्हाण, ज्येष्ठ शिक्षण तज्ज्ञ प्रभाकर कुलकर्णी, नामदेव जगताप, कवि योगिराज माने, आदींसह नगराध्यक्षा सौ. मायावती धुमाळे, उपनगराध्यक्षा सौ. सुषमा मठपती यांची उपस्थिती होती.




भारतीय स्वातंत्र्य लढ्यासह मराठवाडा मुक्तीसंग्रामचा यज्ञ अखंडपणे तेवत ठेवण्यासाठी मराठी साहित्याने मोठे योगदान दिले असल्याचे सांगत आ. निलंगेकर यांनी मराठी साहित्याच्या माध्यमातून साहित्यकांनी स्वातंत्र्य लढ्यात सहभाग नोंदविणार्यांचा उत्साह वाढविण्यासाठी नेहमीच प्रभावशाली साहित्य लिहून त्यांचे मनोबल वाढविण्याचे काम केले असल्याचे सांगितले. साहित्याच्या माध्यमातून जगात विविध क्रांत्या घडलेल्या असून सातत्याने परिवर्तनही घडविण्याची ताकद साहित्यामध्ये असल्याचे आ. निलंगेकर यांनी आवर्जून सांगितले. त्याचबरोबर राष्ट्रभावना अधिक प्रबळ करण्यासाठी साहित्यकांनी सातत्याने आपली लेखणी चालविलेली असून लेखनीमधील ही ताकद अनेकांना झुकविणारी आहे. सध्याच्या राजकारणात काम करणारी अनेक राजकीय मंडळी दिशाहीन झालेली असल्याने राजकारणही गढूळ होऊ लागे-लेले आहे. या दिशाहीन राजकीय मंडळींना दिशा दाखवून राजकारणातही क्रांती घडविणारे साहित्य लेखीनीच्या माध्यामातून साहित्याकांनी घडवावे अशी अपेक्षा आ. निलंगेकर यांनी यावेळी व्यक्त केली.

देशाचा इतिहास सातत्याने लोकांसमोर मांडण्याचे कामही साहित्यातून झालेले असल्याने आपल्या वैभवशाली देशाचे नाव भारत असल्याचे समोर आले असल्याचे मत आ. निलंगेकर यांनी व्यक्त करून इंग्रजानी आपल्या राजवटीत भारताचे नाव बदलत इंडिया केले असल्याचे निदर्शनास आणून दिले. मात्र आपल्या देशाचे वैभव अधिक उंचाविण्यासाठी भारत हेच नाव योग्य असल्याचे सांगत आगामी काळात इंडियाला हटवून इंग्रजांच्या गुलामगिरीचे प्रतीक झटकून द्यावे असे आवाहनही यावेळी आ. निलंगेकर यांनी केले.

## समाजात विचाराचे प्रबोधन होणे ही काळाची गरज -भिक्खू पय्यानंद थेरो



लातूर :- भारतात विविध जात, वर्ण, धर्म, संप्रदाय शाखा असून वेगवेगळ्या रूढी, परंपरा, रीतीरीवाजाची नानाविध संस्कृती व विचार आहेत परंतु प्रत्येक समाजात लोक कल्याणाची गरज आहे त्यासाठी सामाजिक, वैचारिक आणि धार्मिक विचाराचे प्रबोधन काळाची गरज असल्याचे प्रतिपादन पूज्य भिक्खू पय्यानंद थेरो यांनी केले.

दर रविवार, चलो बुद्धविहार अभियानातर्गत विकास नगरातील लॉर्ड बुध्दा बुद्ध विहार येथे सामूहिक बुद्ध वंदना कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी ते मार्गदर्शन करताना बोलत होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी भिक्खू पय्यानंद थेरो व सर्व उपस्थितांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमेचे पुष्प, धूप व दीपाने पुजन करण्यात आले. यावेळी त्रिसरण पंचशील ग्रहण करून सामूहिक बुद्ध वंदना करण्यात आली. तसेच बावीस प्रतिज्ञा व भारतीय संविधान प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.

पुढे बोलताना भिक्खू पय्यानंद थेरो म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समग्र लढ्यामुळे समाजात प्रबोधन होऊन समाजात आमुलाग्र परिवर्तन झाले आहे. प्रत्येक समाजात सामाजिक, धार्मिक आणि वैचारिक प्रबोधनामुळे परिवर्तन शक्य आहे. त्यासाठी समाजातील जबाबदार मंडळीने सर्वोत्परी कार्य केले पाहिजे. बुद्ध विहार हे समाजाला सर्वांगीण उन्नतीच्या दिशेने नेणारे दिशादर्शक मार्गदर्शन स्थळे आहेत. तेव्हा सहपरिवार बुद्ध विहारात आपण गेले पाहिजे.

या प्रसंगी सृष्टी साळवे या बालिकेचा राष्ट्रीयस्तरावरील रस्सीखेच स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवल्याबद्दल सत्कार करण्यात आला

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दैवशाला काटे, निर्मला गौरकर, सिंधुमती बनसोडे, करुणा कांबळे, माया बनसोडे, रेखा शिखरे, रेखा कांबळे, निर्मला मधाळे, सत्यभामा सुरवसे, विमल गंडले, माधव सोनकांबळे, आम्रपाल बनसोडे, प्रशांत माकणीकर, राजाभाऊ उबाळे, तसेच महाबुद्ध वंदना अभिवादन कार्यक्रम सुकाणू समितीच्या सर्व सदस्यांनी प्रयत्न केले.

आकाश सूर्यवंशी, आर. पि. गायकवाड, भीमराव चौदंते, एम. एन, गायकवाड, डॉ. माधव सोनकांबळे, एस. एन. डुमने, सदाशिव काटे, श्रीराम साळवे, एम. एच. सगर, एन. जि. माने, स्मिता गिलचे, पंचशीला चौदंते, निर्मला थोटे, पंचशीला बनसोडे, अंजली सोनकांबळे, सुमन उडानशिव, राधा कांबळे, पार्वती चाटसे, सोजरबाई क्षीरसागर आदी महिला उपस्थित होते.

या वेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयंत कांबळे यांनी केले तर प्रास्ताविक शोभा सोनकांबळे यांनी केले. कार्यक्रमाचा समारोप धम्म पालन गाथा, आशिर्वादाने व सामूहिक राष्ट्रगीताने झाली. या वेळी कार्यक्रमाचे आभार मिलिंद धावारे यांनी मानले. यावेळी परिसरातील मोठ्या संख्येने उपासक उपासिका उपस्थित होते.

## शेत तिथे रस्ता अभियानासाठी पद्मश्री डॉ विठ्ठलराव विखे पाटील रुरल डेव्हलपमेंट फाऊंडेशन पुरस्कार...

औसा - औसा मतदारसंघातील शेती विकासासाठी शेत तिथे रस्ता या अभियानातून सुमारे बाराशे किलोमीटर लांबीचे शेतरस्ते कामे यशस्वीपणे पूर्ण करून हजारो शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीचा मार्ग मोकळा केला आहे.शेत रस्त्याचा औसा पॅटर्न म्हणून संपूर्ण राज्यात नावारूपाला आलेल्या या अभियानाची तसेच मनरेगातून ग्रामसमृद्धी या अभियानातून शेतकऱ्यांना शाश्वत उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण व्हावा यासाठी मोठ्या प्रमाणात केलेली फळबाग लागवड व शेतकऱ्यांच्या जनावरांना बांधून दिलेल्या गोठे आदी कामांची दखल घेऊन पद्मश्री डॉ विठ्ठलराव विखे पाटील रुरल डेव्हलपमेंट फाउंडेशनच्या वतीने आ. अभिमन्यू पवार यांना पुरस्कार जाहीर झाला होता. राज्याचे महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते हा पुरस्कार आ. अभिमन्यू पवार यांच्या पत्नी सौ. शोभाताई अभिमन्यू पवार यांनी स्वीकारला.

पद्मश्री डॉ विठ्ठलराव विखे पाटील रुरल डेव्हलपमेंट फाउंडेशनच्या पुळूज (ता. पंढरपूर) आयोजित सहकारमहर्षी डॉ विठ्ठलराव विखे पाटील यांच्या जयंतीनिमित्त (दि.७) सप्टेंबर रोजी शेतकरी, अधिकारी व पदाधिकारी गौरव सोहळ्यानिमित्त या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. राज्याचे महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या



हस्ते या पुरस्काराचे वितरण यावेळी करण्यात आले. आमदार अभिमन्यू पवार यांनी औसा मतदारसंघातील शेत तिथे रस्ता, मनरेगातून ग्रामसमृद्धी अभियानांतर्गत मोठ्या प्रमाणावर केलेली फळबाग लागवड व जनावरांना गोठे बांधणी या कामासाठी त्यांना हा पुरस्कार देण्यात आला.यावेळी औसा भाजपाच्या वतीने तालुकाध्यक्ष सुभाष जाधव यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

## संपादकीय....

# सलोखा जपूया

गोव्यामध्ये कोणीही दुसऱ्याच्या धर्माविषयी अनुदार उद्गार काढले, तर बोलणाऱ्याचा धर्म न बघता कडक कारवाई करणार असा खणखणीत इशारा मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी दिला आहे. मुख्यमंत्र्यांच्या या इशाऱ्याचे आम्ही स्वागत करतो. अन्यथा आजकाल कोणीही उठावे आणि एकमेकांच्या धर्माविषयी काहीही बरळावे असा प्रकार चालला आहे. काहीही संबंध नसताना, कारण नसताना दुसऱ्याच्या धर्माविषयी काहीतरी अचकट विचकट बोलण्याचे – लिहिण्याचे बरेच प्रकार गेल्या काही दिवसांत झाले. दक्षिण भारतामध्ये तर सनातन हिंदू धर्माविषयी उदयनिधी स्टॅलीनने शेलकी भाषा वापरली. अर्थात, त्यामागे आपल्या पेरियारवादी दाक्षिणात्य मतपेढीला खूष करण्याचाच प्रयत्न अधिक होता. गोव्यामध्ये सर्व धर्मांमध्ये आजवर सुसंवाद राहिला आहे. परंतु गोव्यातही गेल्या वर्षभरात धार्मिक तणाव उत्पन्न करणारे काही प्रसंग घडले. विशेषतः फादर बोलमॅक्स परेरा याने छत्रपती शिवाजी महाराजांवर अकारण शिंतोडे उडवले आणि हिंदू समाजाचा रोष ओढवून घेतला. आता ताळगावच्या एका फादरने हिंदू देवाला ‘खोटा देव’ ठरवून आपल्या अकलेचे तारे तोडले आहेत. शेर्मांव देण्याच्या नादात कुठल्याकुठे वाहावत जाणे ही हल्ली फॅशनच झाली असावी अशा रीतीने वारंवार ही कुरापत काढली जाते आहे. येणाऱ्या लोकसभा निवडणुकीवर नजर ठेवून राज्यामध्ये धार्मिक असंतोष व त्याच्या आधारे ध्रुवीकरण करण्याच्या एका व्यापक षड्यंत्राचा हा भाग तर नव्हे ना याच्या खोलात जाण्याची म्हणूनच गरज निर्माण झाली आहे. चर्चच्या ‘नवसोरणी’ ह्या मुखपत्रामध्ये काही दिवसांपूर्वी प्रसिद्ध झालेल्या लेखाकडे मागे आम्ही एका अग्रलेखात लक्ष वेधले होते. ‘मणिपूर झाले, आता पुढची पाळी गोव्याची असेल’ अशी भीती ख्रिस्ती समाजाला घालायचा पद्धतशीर प्रयत्न त्या मुखपत्रातील लेखात करण्यात आला होता. ‘धिंड काढली जाईल, तयार रहा, आपले कपडे वाचवा’, ‘चर्चेस पाडल्या जातील, धर्मगुरूंना बडवले जाईल, कुटुंबाची काळजी घ्या’ अशी चिथावणीखोर भाषा त्यात वापरली गेली. सुदैवाने आपला विवेक शाबूत असलेल्या गोमंतकीय ख्रिस्ती समाजाने त्याकडे दुर्लक्षच केले. फादर बोलमॅक्स यांनी छत्रपती शिवाजी महाराजांवर शिंतोडे उडवण्याचा उद्धटपणा केला. तेव्हाही ख्रिस्ती समाजातील विचारशील व्यक्तींनी त्या विधानापासून फारकत घेतली. आम ख्रिस्ती समाजानेही त्या विधानाकडे दुर्लक्ष करणेच पसंत केले. आता ताळगावच्या प्रकरणातही आम ख्रिस्ती समाजाला त्या विधानाशी काही देणेघेणे नाही. तो आपल्या दैनंदिन जीवनसंघर्षात व्यग्र आहे आणि असल्या चिथावणीखोर वक्तव्यांनी माथी भडकावून घेण्याएवढा तो सवंग बनलेला नाही. काही ख्रिस्ती धर्मगुरूंच्या तोंडून अशा प्रकारे विष ओकले जात असताना त्याला प्रत्युत्तर म्हणून तशाच विषारी आणि विखारी भाषेचा वापर करायचा प्रयत्न हिंदू समाजामधूनही होताना दिसतो. शेवटी ही प्रवृत्तीही त्याच जातकुळीची आहे. त्यामुळे ‘दुसऱ्याचे ते कार्टे आणि आपला तो बाब्या’ असा आपपर भाव न बाळगता सरकारने अशा उठवळ प्रवृत्तीला एकाच मापात जोखले पाहिजे आणि वेळीच कारवाई केली पाहिजे. अन्यथा अशा संवेदनशील विषयांत काट्याचा नायटा व्हायला वेळ लागत नाही. मुळात सरकारचा घटक असलेल्या मंत्र्यांनीही अशा विषयांत जबाबदारीने वागणे बोलणे अपेक्षित आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची करासवाड्यात विटंबना झाली तेव्हा एका मंत्र्याने फार बेताल वक्तव्ये तेथे केलेली होती. हा प्रकारही तेवढाच आक्षेपार्ह आहे. विशेषतः मंत्रिपदावरील जबाबदार व्यक्तीकडून अशा प्रकारच्या उठवळ विधानांची मुळीच अपेक्षा नव्हती. मतांच्या हिशेबासाठी अशा प्रकारची धार्मिक तणावाची भुतावळ उकरून काढली जाते, तेव्हा तिचा फारतर अल्पकालीक फायदा राजकारण्यांना मिळतो, परंतु त्यातून समाजाचे जे नुकसान होते ते चिरकालीक असते. समाजामध्ये, जातीधर्मांमध्ये उभी फूट पडते तेव्हा ती पुन्हा सांधून यायला युगे लोटावी लागतात एवढी ती खोलवर काळीज चिरत गेलेली असते. गोव्यामध्ये आजवर अनेक विवाद निर्माण झाले, काही तर जाणूनबुजून निर्माण करण्याचे प्रयत्न झाले, परंतु गोमंतकीय समाजाने असल्या उठवळ प्रवृत्तीला आजतागायत भीक घातलेली नाही. हिंदू आणि ख्रिस्ती समाजामध्ये एकमेकांविषयीचा तेवढा विश्वास अजून शिल्लक आहे. याचे मुख्य कारण गोमंतकीय ख्रिस्ती समाजाला गोव्याच्या धर्मांतरपूर्व इतिहासाचा अद्याप विसर पडलेला नाही. त्यामुळेच आपल्या मुळांविषयीची आस्था आणि आपुलकी त्याच्या हृदयात आहे. तिला आणि या बंधुभावाला सुरुंग लावण्याचा प्रयत्न जर कोणी सातत्याने करू पाहात असेल तर सरकारने खरोखरच मुक्याची भूमिका घेऊ नये. परिस्थिती हाताबाहेर जाण्याआधी वेळीच उपद्रवी घटकाची खोड मोडावी हे उत्तम.

# आंबेडकरवादी नेत्यांनी एकत्र यावे....

बोधिसत्व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारावर आम्ही काम करतो व संविधानीक मार्गाने सर्वसामान्य लोकांना न्याय मिळवून देतो आणि संविधानाचे संरक्षण करण्यासाठी आम्ही सदैव तत्पर असतो असे बोलुन अनेक सामाजिक संघटना, राजकीय पक्ष तयार झाले. बोधिसत्व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावावर आंबेडकरवादी अनुयायांना भ्रमीत करून समाजकारणाच्या नावाखाली राजकारण केले जाते. संविधानाला हात लावला तर हात तोडण्याची भाषा करणारे, आंबेडकरवादी अनुयायांवर अन्याय अत्याचार झाल्यावर न्याय मिळेपर्यंत शांत बसणार नाही अशा थापा मारणारे अनेक राष्ट्रीय नेते महाराष्ट्रासह देशात निर्माण झाले. मीच आंबेडकरी चळवळीचा शिलेदार असल्याच्या तोऱ्यात वावरणाऱ्यांची संख्या कमी नाही. आज समस्या वाढत आहेत, संविधानाची अंमलबजावणी जवळपास नसल्यात जमा आहे, समता, बंधुता, न्याय, स्वातंत्र्य, शिक्षण, आरक्षण ह्या बाबी फक्त संविधानाच्या पुस्तकात बंद आहेत. देशाची अर्थ व्यवस्था उद्योगपतींच्या घशात तर राजकीय व्यवस्था लुटारू च्या घशात गेली आहे. तरीही स्वंयघोषणा करणारे आणि स्वतः ला बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे अनुयायी समजून गटतटाच्या नावाखाली स्वतः ची दुकानदारी चालवणाऱ्यांनी आता तरी शहाणे व्हावे. बाहेर राहुन किती ही ओरडलो तरीही काहीच परिणाम होणार नाही. त्यासाठी आत जाणे आवश्यक आहे. आणि आत जायचे असेल तर सर्वांनी एकत्र येऊन माण पान पदाची अपेक्षा न करता चळवळीचा कार्यकर्ता म्हणून काम करावे. आज बेकीने आहात एकही आमदार खासदार नाही, एक झाले तर किमान काही आमदार आणि खासदार निवडून येतील. ते लोक आत मध्ये सर्वसामान्य लोकांच्या शिक्षण, आरोग्य, नोकरी, सामाजिक न्याय, सामाजिक समतेचे मुद्दे मांडून लोकशाही चे जतन करून सर्वसामान्य लोकांच्या समस्या तरी मांडतील. सर्व जन खरचं बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने खरचं चळवळीचे काम करत असाल तर चळवळ करताना कसला मान पान आणि पद घेऊन बसलात. घरची भाकरी बांधुन चळवळीची बांधणी करून लोकांच्या हक्क अधिकारासाठी लढणारी फळी आज थकली आहे. म्हणून दुसऱ्या फळीची जबाबदारी आजच्या सर्वच नेत्यांवर आणि अनुयायांवर आलेली आहे. शिक्षणाचा बाजर करून मुलांचे शिक्षण महाग केले, सार्वजनिक मालमत्तेचे खाजगीकरण करून आरक्षण बंद केले म्हणजेच शिक्षण आणि आरक्षण बंद केल्याने विकासाचे मार्ग च बंद होताना जर प्रत्येक जन स्वतः चे स्वयंघोषित राष्ट्रीय पद घेऊन बसत असेल तर संविधान, चळवळ व सर्वसामान्य लोकांच्या समस्या यावर कोणी बोलायचे? स्वतः ला आंबेडकरवादी समजून घेताना पहिले बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व कार्य समजून घेणे गरजेचे आहे. केवळ बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेऊन आपण फक्त आपली स्वतः ची जाहिरात करू शकतो. परंतु चळवळ टीकवू शकत नाही किंवा तिला बळकटी देऊ शकत नाही. बाबासाहेबांनी दिलेला संदेश व त्यांचे विचार न माणणाऱ्या लोकांना मी आंबेडकरवादी चळवळीचा नेता आहे असे म्हणण्याचा नैतिक अधिक मुळीच नाही. चार पाच बेरोजगार तरुणांना सोबत घेऊन फिरल्याने कोणी राष्ट्रीय नेता होत नाही. प्रत्येक गटातील चार पाच चार पाच तरुण व स्वयंघोषित राष्ट्रीय नेता एकत्र आले तर चळवळीला मात्र आपण राष्ट्रीय स्तरावर पोहचवू शकतो. म्हणून अजूनही आंबेडकरवादी नेत्यांनी शहाणे होऊन एकत्र येणे आवश्यक आहे. आणि ज्या कोणाला एकत्र यायचेच नसेल, चळवळीच्या नावाखाली स्वतः ची दुकानदारी चालवून चार पाच बेरोजगार तरुणांच्या सहकार्याने राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून मिरवायचे असेल तर खुशाल मिरवा फक्त तुम्ही बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेऊ नका. बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर हे कोणाचीही खाजगी संपत्ती नाही. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेऊन स्वतः चे पोटभरणे व स्वतः ची दुकानदारी चालवणे बंद करून आपण नैतिक आहोत हे तरी सिद्ध करावे. आंबेडकरवादी चळवळ ही स्वार्थकेंद्रीत नसून ती समाजातील शेवटच्या घटकाला विकासाची संधी निर्माण करून देणारी आहे. परंतु आज बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने स्वतः चेच पोटभरण्याचे उद्योग सुरू केले आहेत. चळवळीच्या नावाखाली स्वतः ची दुकानदारी थाटणे, मीच खरी चळवळ चालवतो, मलाच बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व कार्य समजले, माझ्या शिवाय सर्वसामान्य लोकांना न्यायच मिळू शकत नाही, कुठेही अन्याय अत्याचार झाला तर मीच सर्वात अगोदर तिथे जातो अशा अविर्भावात राहणाऱ्यांनी चळवळीचे काम नाही केले तरी चालते. अशा लोकांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर व आंबेडकरवादी चळवळीचे नाव घेऊच नाही. बाबासाहेब आंबेडकर व आंबेडकरवादी चळवळीचे नाव न घेता भाऊ तुम्ही आतंरराष्ट्रीय नेता बना, स्वतः ची दुकानदारी खुप मोठी करा जनतेला काहीच फरक पडणार नाही. परंतु जर बाबासाहेब आंबेडकर यांचे व आंबेडकरवादी चळवळीचे नाव घेऊन गटातटात राहत असाल तर लोकांच्या प्रश्नांना उत्तरेच द्यावे लागणार नाही तर लोकांच्या मर्जीने राहवे लागेल. म्हणुन सध्या आंबेडकरवादी लोकांची एकच ईच्छा आहे ती म्हणजे सर्वांनी एकत्र येऊन पद पैसा याची अपेक्षा न करता एक कार्यकर्ता म्हणून काम करावे. एकिकरणात जी जबाबदारी देण्यात येईल ती पार पाडून आपल्या हक्काचे प्रतिनिधी आपल्याला निवडून आणणे आवश्यक आहे. आणि पद पैसा बाजूला सारुन एकत्र येता नसेल तर भाऊ तुम्ही स्वतः ला आंतरराष्ट्रीय नेते म्हणुन जरी घेतले तरीही लोकांना त्याचे काहीच घेणे देणे नाही आणि तुमच्या पदाचा जनतेला फायदा पण नाही. बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितलेले संदेश आम्हाला बरोबर कळाले नाही अर्धवट वाचुन समजून न घेता उठ सुट जो तो राष्ट्रीय नेता होत आहे. पण नेत्याचे कोणतेही काम मात्र करत नाही. बाबासाहेब आंबेडकर यांनी शासन कर्ती जमात बनायचे सांगितले आणि आम्ही भाषण करते बनलो. बाबासाहेब आंबेडकर यांनी एकजूट करून संघर्ष करायला सांगितले आम्ही फुट पाडून पोटासाठी संघर्ष करायला लागलो, स्वयंघोषित राष्ट्रीय नेते अनेक आहेत परंतु एकाही नेत्याने स्वतः च्या गावातील गोर गरिब विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची जबाबदारी घेऊन त्याला स्वतः च्या पायावर उभे करायला मदत केली नाही. आंबेडकरवादी चळवळीला हजारो नेते आहेत, लाखों लोक सुशिक्षित आहेत, हजारो लोक भाषणे करतात, परंतु आंबेडकरवादी चळवळीचा स्वतः चा मिडिया उभा करता आला नाही. आणि जे काही वृत्तपत्र चळवळीचे खऱ्या अर्थाने काम करतात त्या वृतपत्रांना सहकार्य करून ते वाढवताही आले नाही. जेव्हा लोकांना वाचता येत नव्हते, लोकांकडून जाहीराती येत नव्हत्या तेव्हा बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी चार चार वृत्तपत्र स्वतः च्या खिशातून पैसा खर्च करून चालवले, मुकनायकला राजर्षी शाहु महाराज यांनी राजाश्रय देऊन मदत केली. परंतु आज लोकांकडे पैसा आहे, वाचक आहेत, जाहीराती आहेत तरीही चळवळीतील वृतपत्रांना मदत न करता इतरांचे घरे भरणाऱ्या लोकांना डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेण्याचा कुठलाच अधिकार उरत नाही. म्हणून एक व्यक्ती सर्व काम करू शकत नाही म्हणून सर्व जन एकत्र येऊन एक एक काम केले तर सर्व काम झाल्याशिवाय राहत नाही. परंतु याची जाणीव लोकांना राहीली नाही. राष्ट्रीय नेत्यांच्या नावाखाली स्वतः च्या दुकानदारी व चळवळीशी बेईमानी करण्यात धन्यता माणणारे अनेक लोक आहेत. स्वयंघोषित राष्ट्रीय अध्यक्ष एकत्र आले तर कोणी राजकीय क्षेत्र बघेल, कोणी शैक्षणिक क्षेत्र बघेल, कोणी सामाजिक तर कोणी मिडीयाचे क्षेत्र बघेल, सामाजिक निधी संकलन करून शिक्षणसंस्था, आरोग्य संस्था, बँक उद्योग निर्माण करून तरूणांना रोजगार निर्माण होईल. सामाजिक, राजकीय वजन वाढेल. चळवळीला मोठा मिडिया मिळून चळवळीची गती वाढेल. कारण चळवळीला वृत्तपत्र नसेल तर त्याची गत पंख छाटलेल्या पक्षा प्रमाणे असते ही डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची शिकवण आम्ही विसरून गेलो. एकत्र आले तर केवळ राजकीय च नाही तर सर्वांगीण फायदे होऊन समाजाच्या हिताचे काम करून समाजाला विकासाच्या स्थानावर नेऊ शकतो. म्हणून स्वतः ची दुकानदारी बंद करून, स्वयंघोषित राष्ट्रीय अध्यक्ष बाजूला सारून, एकमेकांना बद्दलचे मतभेद विसरून केवळ आणि केवळ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने प्रेरित होऊन त्यांनी निर्माण केलेल्या मार्गाने जायचे. स्वतः नवीन मार्ग तयार करण्याचा प्रयत्न करू नये. कारण ते शक्य नाही. आणि सध्या वेळ आहे एकत्र येण्याची म्हणून सर्वांनी एकत्र येऊन सामाजिक, आर्थिक, राजकीय उन्नतीसाठी हातभार लावावा हिच एक अपेक्षा.

विनोद पंजाबराव सदावर्ते
समाज एकता अभियान
रा. आरेगांव ता. मेहकर
मोबा: ९१३०९७९३००

# ’इंडिया’ नाव बदलायचा काहीच अधिकार नाही।

कलम ०१नुसार आपल्या देशाचे नाव भारत अर्थात इंग्रजीत इंडिया हे नाव आपल्या संविधान सभेत सर्व मत मंजूरीने सर्व मान्य केले गेलेले आहे म्हणून देशातील कोणत्याही व्यक्ती व पक्ष संघटनाला इंग्रजी असो वा मराठी असो देशाचे नाव बदलायचे अधिकार नाहीत कारण देशाचे नामकरण करायचे म्हणले तर सर्व प्रथम आपल्या देशाच्या राज्य घटनेवरील पूर्वीच इंग्रजी मधून इंडिया असा उल्लेख केला गेलेला आहे म्हणून इंडिया शब्दाचा त्याग करून भारत हे नामकरण होणे अशक्य वाटते. या नामकरण विचारामुळे आपला देश मागे नेला जात आहे. यासाठी इंग्रजी मधील नाव काढून टाकून मराठी भारत नामकरण केल्याने भारत ऑफ कॉन्सिटीटयुशन असे अयोग्य् चुकीचे नामकरण केले जात आहे. परंतु भारताच्या इंग्रजी इंडीया नावाला नाकारले जात असण्याचे काय महत्वाचे कारण आणि कोणता खरा हेतू व उद्देश असेल ? तेव्हा काहीतरी विशेष संविधानिक माहिती कारण जाणून घेण्याचे सर्वांना योग्य हक्क अधिकार मानला जात आहे... इंडिया या इंग्रजी नावाला बदलून इंग्रजीच्या जागी भारत हेच मराठी नावाचे भाषांतर लावून विद्रोपीकरण केले जात असल्याने आपल्या राज्य घटनेला इंडिया हा इंग्रजी जोडशब्द वगळून मराठी शब्द मिसळून भारत नामकरण केले जात असल्यामुळे हा सार्वजनिक संविधानाचा अपमान केला जात आहे. यामुळे नागरिकांच्या मूलभूत समस्यात आणखी वाढ होऊन देशात फारच कठीण गंभीर व भयानक सामाजिक आर्थिक, वातावरण परिस्थिती निर्माण झालेली आहे. पूर्वी पासून ते आज पर्यंत नेत्या पासून ते सर्व सामान्य् नागरिक असे म्हणत् आलेले आहेत की, आपल्या भारतीय संविधान किंवा त्यावरील अक्षराला सुद्धा कोणी धक्का लावला व हात लावणाऱ्यास आम्ही त्याला कधीच माफ करणार नसून केव्हाच सोडणार नाहीत, आता ही सर्व मंडळी कुठे गेली आहे? मराठा समाजाच्या आरक्षणाची मागणी मराठा क्रांती मोर्चा द्वारे केली जात आहे. परंतु माझ्या बहुजन मराठा बांधवांना सांगणे आहे की, अगोदर भारतीय संविधानाची बरोबर तंतोतंत नियमाप्रमाणे अंमलबजावणी झाल्याशिवाय मराठा आरक्षणाची नियमानुसार अंमलबजावणी होईल का? आणि मागासवर्गीय बहुजन व मराठा बहुजन यांनी एकत्र येऊ नये त्यासाठी रात्र दिवस मनुवादी लोकांनी गावात शहरात नजर लक्ष ठेवून खबरदार राहून गोडबोलून काही आमिष दाखवून काहींची दिशाभूल करून व प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष दबाव कारणाने आपल्या सामाजिक आर्थिक न्याय हक्काच्या मागण्यांची पुर्तता होऊ नये याकरिता त्यांचे खोटे प्रयत्न चालू असतात. तसेच भाजप असो की कॉंग्रेस जातीवादी नेता असो यांच्या हस्तका मार्फत खरे बोलणाऱ्या किंवा अभिव्यक्ती स्वातंत्र्यासाठी कोणी पुढे आले की, त्या व्यक्तीला त्रास छळ सहन करावा लागून काही सरकारी कामात अडथळा आणला जातो. नाही तर काही राजकीय गुप्त हस्तक्षेप करून त्या व्यक्तीवर सामाजिक बहिष्कार टाकला जातो.

सर्व जनता नागरिक यांच्या समोर देशाच्या पदावर बसण्या अगोदर शपथ ग्रहन करते वेळी मी संविधानिक लोकशाही राज्यकारभार करण्याची जबाबदारी घेऊन शपथ व पूतिज्ञा घेत आहे असे सर्वांना बोलून वचन देऊन देशाची जिम्मेदारी कर्तव्य् विसरले जात आहे. ही आठवण सर्व नागरिकांनी करून द्यावी. तसेच आपल्या सामूहिक संविधानावरील इंडिया जेथे आहे तेथे कायम शब्द राहण्यासाठी आणि ’भारत मराठी शब्द मागे घेण्याकरिता सर्व समाजाच्या नागरिकांना नम्र विनंती. जय संविधान !



---------------

रमेश कांबळे रा. परतूर जि. जालना मो. नं. ८८०५५८२४८०

# क्रीडा संकुल परिसरात स्वच्छता राखावी, मैदाने व क्रीडा साहित्याची दुरुस्ती करावी

लातूर /प्रतिनिधी दि. ११ :- लातूर जिल्हा क्रीडा संकुल परिसरात स्वच्छता राखावी, मैदाने व क्रीडा साहित्याची तातडीने दुरुस्ती करावी. सुरक्षा व्यवस्था अधिक सक्षमपणे उभारावी, नवीन मैदाने उभारणीचे प्रस्ताव तयार करून शासनाकडे पाठवावेत, अशा सूचना करून या प्रस्तावांचा पाठपूरावा करून त्यासाठी निधी उपलब्ध करून दिला जाईल, अशी ग्वाही राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी दिली. माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी सोमवार दि. ११ सप्टेंबर २०२३ रोजी सकाळी लातूर शहरातील जिल्हा क्रीडा संकुल येथे जाऊन तेथील सुविधा व अडचणींचा आढावा घेतला. यावेळी झालेल्या बैठकीस लातूर जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे, मनपा उपायुक्त मंजुषा गुरमे, मनपा शहर अभियंता नवनाथ केंद्रे, लातूर शहर उपविभागीय पोलिस अधीक्षक भागवत फुंदे,



महाराष्ट्र राज्य परिवहनचे लातूर स्थानक प्रमुख हनमंत चपटे, लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्रीशैल्य उटगे, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता राजेंद्र बिराजदार, उपअभियंता संजय सावंत, शाखा अभियंता भास्कर कांबळे, विनोद खाडे, लातूर हॉलीबॉल असोसिएशनचे सचिव दत्ता सोमवंशी, लातूर शहर युवक काँग्रेसचे अध्यक्ष इमरान सय्यद, वाहतूक पोलीस निरीक्षक गणेश कदम, छत्रपती शिवाजी महाराज चौक पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दिलीप सागर, मनपा स्वच्छता निरीक्षक रमाकांत पिडगे, सिद्धाजी मोरे व्यंकटेश पुरी आदीसह खेळाडू प्रशिक्षक उपस्थित होते. प्रारंभी जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे व लातूर हॉलीबॉल असोसिएशनचे सचिव दत्ता सोमवंशी यांच्याकडून क्रीडा संकूलातील व्यवस्थांची तसेच समस्या संबंधी माहीती घेतल्या नंतर माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, जिल्हा क्रीडा संकुलच्या मेन गेट समोर एसटी बसेसना थांबा देण्यात येऊ नये क्रीडा संकुल प्रवेशद्वारापासून शंभर मीटर अंतरावर बस थांबा करावा, दुचाकी चोरी व इतर गैरप्रकार टाळण्यासाठी पोलीस यंत्रणेने लक्ष घालावे, वस्तीगृह आणि स्वच्छता दुरुस्ती सोबतच प्रलंबित कामेही बांधकाम विभागाने तातडीने करून घ्यावीत, क्रीडा संकुलावरील प्रकाश व्यवस्था, सीसीटीव्ही आणि ट्रॅक वरील म्युझिक सिस्टीम तातडीने दुरुस्त करून घ्यावी, खेळाडूंना स्वच्छ पाणीपुरवठा उपलब्ध होण्यासाठी लवकरात लवकर आरओ यंत्रणा उभारावी, स्केटिंग, हॉलीबॉल, लांबउडी, बास्केटबॉल, हॉलीबॉल मैदानाची दुरुस्ती करून घ्यावी, मैदानातील पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी, पाणी साठवण्यासाठी टँक आणि छत बांधण्यात यावेत, स्विमिंग पूल, त्याचबरोबर कुस्ती अकॅडमी, क्रिकेट प्रशिक्षण केंद्र उभारण्यासाठीचे प्रस्ताव तयार करावेत. कबड्डी, खो-खो, व इतर स्वतंत्र मैदाने उभारण्याच्या दृष्टीने जागा उपलब्धतेसाठीचे प्रस्ताव तयार करावेत, या सर्व सुविधा उभारण्यासाठी आवश्यक असणाऱ्या निधीची मागणी करावी अशा सूचनाही त्यांनी योवळी केल्या. शासनस्तरावर पाठवलेल्या प्रस्तवाचा पाठपूरावा करून निधी व जागा उपलब्ध करून दिला जाईल अशी ग्वाही आमदार देशमुख यांनी दिली. या बैठकीचे शेवटी आभार बी.एम.(पप्पू) घोलप यांनी मांनले.

# राज्य व केंद्र शासनाने मराठा समाजाला आरक्षण मिळवून देण्यासाठी त्वरीत कार्यवाही करावी

## लातूरात उपोषणस्थळी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांची भेट


लातूर /प्रतिनिधी -मराठा समाजाला आरक्षण मिळावे या मागणीसाठी लातूर येथील तहसील कार्यालयानजीक आदित्य देशमुख यांनी उपोषण सुरू केले आहे, राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी सोमवार दि. ११ सप्टेंबर २०२३ रोजी सकाळी १० वाजता सहकाऱ्यांसह उपोषण स्थळी भेट देऊन, उपोषणकर्त्यांच्या प्रकृतीची विचारपूस करून संबंधीत यंत्रणांना त्यांच्या प्रकृतीची काळजी घेण्यासंबंधी सूचना केल्या. काँग्रेस पक्ष आणि आपण व्यक्तिशः मराठा समाजासोबत असून समाजाच्या सर्व मागण्यांना व त्यासाठी सुरू असलेला आंदोलनाला आपला पाठिंबा असल्याचेही यावेळी



माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी सांगितले. तसेच राज्य व केंद्र शासनाने मराठा समाजाला आरक्षण मिळवून देण्यासाठी त्वरीत कार्यवाही करावी अशी मागणी योवळी त्यांनी केली. राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी सोमवार दि. ११ सप्टेंबर २०२३ रोजी सकाळी १० वाजता लातूर तहसील कार्यालया जवळ मराठा समाजाच्या वतीने करण्यात येत असलेल्या उपोषणस्थळी भेट दिली. उपोषणकर्ते आदित्य देशमुख यांच्या प्रकृतीची चौकशी केली. मराठा समाज बांधव सहकारी व सबंधित यंत्रणांनी अदित्य देशमुख यांच्या तब्येतीची काळजी घ्यावी, अशी विनंती आमदार देशमुख यांनी केली. यावेळी लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्रीशैल उटगे, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, अप्पासाहेब देशमुख, राम काळे, आकाश एंजिले, लातूर शहर जिल्हा काँग्रेस सचिव अविनाश बटटेवार, लातूर मराठा क्रांती मोर्चाचे विविध पदाधिकारी उपस्थित होते.

# इंजिनिअर रमेश रंगारी यांचे दुःखद निधन.

मुंबईः- डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची कामगार चळवळ घरा-घरात पोचविण्यासाठी अथांग प्रयत्न करणारे आणि वृत्तपत्रांतून सतत वैचारीक प्रबोधन लेख लिहणार,महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेचे संस्थापक सदस्य, तत्कालीन मरावि मंडळाचे निवृत्त अधिक्षक अभियंता, स्वतंत्र मजदूर युनियनची संकल्पना मांडून देशात फुले आंबेडकरी विचारांची कामगार चळवळ निर्माण होण्यासाठी ज्यांनी अथक



परिश्रम केले असे विद्वान विचारवंत,अभ्यासक,कुशल संघटक,लेखक मा.इंजिनिअर रमेश रंगारी यांचे वयाच्या ८० व्या वर्षी सोमवारी११ सप्टेंबर रोजी त्यांचे रहाते घरी,चारकोप,कांदिवली मुंबई येथे दुःखद निधन झाले.

इंजिनिअर रमेश रंगारी यांच्या निधनामुळे भारतात फुले आंबेडकरी विचारांची कामगार चळवळ निर्माण करणारे एक खंबीर नेतृत्व काळाच्या पडद्याआड गेले आहे. महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटन, स्वतंत्र मजदूर युनियन व देशातील सर्व संलग्न संघटनांतर्फे त्यांच्या दुःखद निधनाबद्दल भावपूर्ण आदरांजली व्यक्त करण्यात येत आहे.

# रुग्ण हक्क संरक्षण समिती टिम महाराष्ट्र लातूर भूषण पुरस्काराणे सन्मानित



लातूरः- अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती आणि ब्रिक्स मानव अधिकार मिशन नवी दिल्लीच्या वतीने रविवार दिनांक १० सप्टेंबर रोजी लातूर येथे आयोजित पुरस्कार वितरण समारंभात राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर(बाबा), माजी महापौर सुरेशजी पवार,माजी नगरअध्यक्ष,राष्ट्रवादीचे नेते तथा जेष्ठ विधिज्ञ् अँड व्यँकटराव बेद्रे साहेब यांच्या हस्ते रुग्ण हक्क संरक्षण समिती महाराष्ट्र टिमला लातूर भूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. संपूर्ण महाराष्ट्रात रुग्ण हक्काच्या संरक्षणार्थ केलेल्या कार्याची आणि समिती माद्यमातून कायम रुग्ण सेवेसाठी संपूर्ण टिमने केलेल्या कार्याची दखल घेऊन शाल श्रीफळ, छत्रपती शिवाजी महाराज यांची प्रतिमा आणि सन्मानचिन्ह देऊन संपूर्ण टिमला सन्मानित करण्यात आले. सदर पुरस्कार सन्मान स्विकारण्यासाठी रुग्ण हक्क संरक्षण समितीचे संस्थापक अध्यक्ष अँड निलेश करमुडी,प्रदेशअध्यक्ष हणमंत गोत्राळ,महिला प्रदेशअद्यक्ष रेणुकाताई बोरा, मराठवाडा संपर्क प्रमुख प्रा शंकरराव सोनवणे, पश्चिम महाराष्ट्र कार्याध्यक्ष गोविंदराव विभुते, निलंगा तालुका कार्याध्यक्ष प्रशांत साळुंके,सांगोलाचे चंद्रकांत काटे,युवती प्रमुख सुष्मीता बोरा, शहर संपर्क प्रमुख कृष्णा राठोडकर, ध्रुव गोत्राळ, शिवसम्राट विद्यार्थी वाहतूक सेनेचे मराठवाडा अध्यक्ष दत्ता होळकर, गोविंद फलटणकर, संतोष वाघमारे, राम चिलमे, संदीपानं मोरे, खंडू सुरवसे, संजय जमदाडे,आदी सर्व पदाधिकारी समिती हितचिंतक उपस्थित होते

# अखंड सजीव सृष्टीचं वास्तव मांडणारा सत्य परिस्थिती वर आधारित खळगं चित्रपट २२ सप्टेंबर पासून महाराष्ट्राभर प्रदर्शित-लेखक निर्माते गोवर्धन दोलताडे

लातूर :- सध्या सर्वत्र एकामागोमाग एक चित्रपट बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालण्यात व्यस्त आहेत. आजकाल मराठी चित्रपटही नवनवीन प्रयोग करताना दिसत आहेत. प्रेक्षकांनीही मराठी सिनेमे पाहण्यासाठी आता चित्रपटगृहांची वाट धरली आहे. दरम्यान बराचसा प्रेक्षकवर्ग हा आता ग्लॅमरपेक्षा आता सत्यपरिस्थितीवर आधारित चित्रपटांकडे वळला आहे. अशातच गावखेड्यातील व सत्यघटनेवर आधारित एका नव्या कोऱ्या चित्रपटाने साऱ्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. थरारक, रहस्यमय विषयावर भाष्य करणारा आणि समाजातील वास्तववादी बाजू मांडणाऱ्या 'खळगं' हा चित्रपट येत्या २२ सप्टेंबरपासून प्रेक्षकांच्या भेटीला येण्यास सज्ज असून सदर चित्रपट सर्वानी पाहावा असे लातूर येथे आयोजित पत्रकार परिषदेत चित्रपटाचे मुख्य लेखक निर्माते गोवर्धन दोलताडे यांनी बोलताना सांगितले. अनाथ मुलांच्या अंतर मनाची व्यथा सांगणाऱ्या या चित्रपटाच्या दिग्दर्शनाची धुरा दिग्दर्शक शिवाजी दोलताडे यांनी पेलवली आहे. 'कार्तिक फिल्म्स एंटरटेनमेंट' प्रस्तुत हा चित्रपट असून या चित्रपटाच्या निर्मितीची धुरा 'कार्तिक फिल्म्स एंटरटेनमेंट'सह निर्माते गोवर्धन दोलताडे, सुरेश तांदळे, रोहन पाटील यांनी सांभाळली आहे. तर सहनिर्माते म्हणून लिला डेव्हलपमेंट, अनुराधा किसनराव नजनपाटील यांनी बाजू सांभाळली आहे. चित्रपटाची कथा, पटकथा, संवाद शिवाजी दोलताडे, गोवर्धन दोलताडे यांचे असून चित्रपटाच्या संगीताची जबाबदारी सचिन अवघडे यांनी उत्तमरीत्या साकारली आहे. गावखेड्यात चित्रित झालेल्या आणि वास्तविकतेचं दर्शन घडवणाऱ्या या आशयघन चित्रपटात नवोदित



कलाकारांनी चांगलाच कल्ला केला. माधवी जुवेकर , कार्तिक दोलताडे , सुलतान शिकलगार , रोशनी कदम , प्रज्वल भोसले , प्रितम भंडारे , कल्यानी पवार, शिवाजी दोलताडे ,माणिक काळे , वैष्णवी मुरकुटे , ज्वालामुखी काळे , भैरव जाधव , संकेत कवडे , शिल्पा कवडे , मयूर झिंजे , मोहन घोलप , मंगेश ससाणे , ऐश्वर्या लंगे , गणेश शिंदे , शरद पवार या कलाकारांनी चित्रपटात उत्तम अभिनय साकारला आहे. नवोदित अभिनेत्यांनी केलेला हा चित्रपट आहे असं त्यांचा अभिनय पाहून म्हणणं चुकीचं ठरेल, यांत शंकाच नाही. चित्रपटाच्या टिझरने या साऱ्यांची रंगत वाढवलीच आहे, आता उत्सुकता लागून राहिली आहे ती चित्रपट प्रदर्शनाची. येत्या २२ सप्टेंबरला हा चित्रपट संपूर्ण महाराष्ट्रात धुमाकूळ घालण्यास सज्ज झाला असल्याची त्यांनी बोलताना सांगितले.

# भाजपाच्या औसा ग्रामीण व कासारसिरसी मंडळ अध्यक्षांची फेरनिवड तर औसा शहराध्यक्षपदी सुनील उटगे...

## नूतन जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख व माजी जिल्हाध्यक्ष रमेश कराड यांचा सत्कार......

औसा - औसा विधानसभा मतदारसंघातील भाजपच्या औसा ग्रामीण अध्यक्षपदी सुभाष जाधव व कासारसिरसी मंडळ अध्यक्षपदी ज्ञानेश्वर वाकडे यांची फेरनिवड तर औसा शहर भाजपच्या अध्यक्षपदी सुनील उटगे यांची निवड करण्यात आली आहे.(दि.१०) सप्टेंबर रोजी औसा येथील औसा विधानसभा मतदारसंघ संघटनात्मक बैठक आणि नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार समारंभात या निवडीची अधिकृतपणे घोषणा करण्यात आली असून याप्रसंगी भाजपचे नूतन जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख यांचा गौरव व मावळते जिल्हाध्यक्ष रमेश कराड यांचा सत्कार औसा भाजपाच्या वतीने आमदार अभिमन्यू पवार यांनी केला.



यावेळी मंचावर नूतन जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख, आमदार रमेश कराड, आमदार अभिमन्यू पवार, लातूर लोकसभेचे प्रभारी राहुल केंद्रे, जिल्हा प्रभारी संतोष मुक्ता, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शेखर सोनवणे, उपसभापती प्रा भीमाशंकर राचट्टे, संगायो समितीचे अध्यक्ष काकासाहेब मोरे, भाजपचे तालुकाध्यक्ष सुभाष जाधव, कासारसिरसी मंडळाचे अध्यक्ष ज्ञानेश्वर वाकडे, भाजपचे नूतन औसा शहरध्यक्ष सुनील उटगे, महेश पाटील, लहू कांबळे,धनराज परसणे, कल्पना डांगे, कल्पना ढविले,युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष सचिन आनसरवाडे आदीसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठय़ा संख्येने उपस्थित होते.यावेळी आमदार अभिमन्यू पवार बोलत होते की भाजप पक्ष हा एक परिवार आहे. पद हि भूषणीय नाही तर एक जबाबदारी आहे.पक्ष हा कोणी एकाचा नसतो पक्ष पक्ष असतो नेता नेता असतो लातूर जिल्हय़ात त्या त्या ठिकाणी पक्ष बांधणीचे काम सुरू असून नूतन जिल्हाध्यक्षांनी सर्वांना समान न्याय द्यावा पक्षाच्या कार्यपद्धतीने पक्ष चालावा अशी अपेक्षा यावेळी त्यांनी व्यक्त करीत रमेश कराड यांनी जिल्हाध्यक्ष म्हणून धडाडीचे काम केले विशेषता कोव्हीडच्या काळात त्यांचे काम उल्लेखनीय राहिल्याचे त्यांनी सांगितले.या प्रसंगी औसा तालुक्यातील अनेकांनी भाजपामध्ये प्रवेश केला त्यांचा सत्कार पक्षाच्या वतीने उपस्थित मान्यवरांने केला या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन दिपक चाबुकस्वार यांनी केले.

**शेतरस्त्यांचा पॅटर्न तयार करणारे महाराष्ट्रातील अभिमन्यू पवार एकमेव आमदार - दिलीपराव देशमुख**

आमदार अभिमन्यू पवार यांनी शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वाच्या शेत तिथे रस्ता या अभियानातून तेराशे किलोमीटर लांबीचे शेतरस्ते कामे पूर्ण केले हे महाराष्ट्रातील एकमेव आमदार आहेत ज्यांनी तेराशे किलोमीटर लांबीचे शेतरस्ते तयार केले आहेत. त्यांच्या या कामामुळे हजारो शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीचा मार्ग मोकळा झाला असून येणाऱ्या काळात होणाऱ्या निवडणुकीत पक्ष बांधणीसाठी आपली साथ महत्वपूर्ण असून येणाऱ्या काळात जिल्हय़ातील जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगरपालिका आपण ताब्यात घेऊ असे यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख म्हणाले.

**औसा मतदारसंघ आज राज्यात अव्वल - रमेश कराड**

यावेळी बोलताना आ. रमेश कराड म्हणाले की ज्या विधानसभा मतदारसंघात भाजपाचे काहिच काम नसताना आमदार अभिमन्यू पवार यांनी स्व:च्या कर्तुत्वावर व नियोजनातून ताब्यात घेतला तो औसा मतदारसंघ आज राज्यात अव्वल असून गेल्या पन्नास वर्षांत जे काम झाले नाही ते काम आज आ. अभिमन्यू पवार यांच्या रुपाने होत असून आपल्या सर्वांची जबाबदारी आहे कि असे नेतृत्व संभाळण्याची

# दयानंद शिक्षण संस्थेत मागासवर्गीय कर्मचाऱ्यावर अन्याय

लातूर – महाराष्ट्रसह देश पातळीवर शिक्षणाचे माहेर घर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दयानंद शिक्षण संस्थेचे नाव सर्वजण आदराने घेत असतात परंतु काही दिवसापासून त्या शिक्षण संस्थेत जातीय राजकारण होते की काय असेच म्हणावे लागेल.माजी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी दयानंद शिक्षण संस्थेत भेट दिली असता त्यावेळी त्या निमंत्रण पत्रिकेवर मागासवर्गीय खासदार असलेले जयवंतराव आवळे यांचे साधे नावही घेतले नव्हते.त्यामुळे त्याही वेळेस समाज बांधवांनी कॉलेज समोर गोंधळ घातला होता.

दयानंद विज्ञान महाविद्यालयात वडिलांच्या जागेवर अनुकंपा तत्त्वावर मुलाला म्हणजेच सुभाष साठे यांना सेवक पदावर घेतो म्हणून संस्थेने तब्बल नव वर्षे त्याला विनाअनुदानित तत्त्वावर काम करून घेतले आहे.दयानंद विज्ञान महाविद्यालयात सेवक म्हणून काम करत असलेले मागासवर्गीय सुभाष साठे यांना नाले काम कर, शौचालय साफ करून घे, असे काम प्राचार्य दरगड यांनी वेळोवेळी सांगितल्याने अनेक वेळा त्यांच्यात




बाचाबाची झाली प्राचार्यांनी त्यांना नोटीसाही दिल्या. यामुळे वाद विकोपाला गेला व एका दिवशी तू उद्यापासून कॉलेजला कामाला येऊ नको असे प्राचार्य यांनी साठे यांना सांगितले.

साठे हे लोकशाही मार्गाने न्याय मिळावा म्हणून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आपल्या लेकरा, बायकोस अमरण उपोषण करत आहेत.अमरण उपोषणाचा आज नववा दिवस.गेले काही दिवसात उन्हाचा किंवा पावसाचा न विचार करता ते उपोषण करत असल्यामुळे त्यांची सोमवारी ११ सप्टेंबर रोजी तब्येत खूप खालावली आहे,ही बातमी वाऱ्यासारखी शहरात व जिल्ह्यात पसरल्यामुळे विविध संघटनांचे प्रमुख यांनी साठे यांना विचारणा केले असता कॉलेजच्या एकाही प्रतिनिधींनी मला या ठिकाणी भेटायला आले नाहीत. त्यामुळे या सर्व प्रमुखांनी कॉलेजच्या प्राचार्यांना भेटून ताबडतोब हे उपोषण सोडा व दोन दिवसात याचा निकाल लावा अन्यथा लोकशाही मार्गाने आपल्या कॉलेज समोर लातूर जिल्ह्यातील सर्व संघटनेच्या वतीने धरणे आंदोलन करण्यात येईल असा इशारा यावेळी प्राचार्यांना देण्यात आला.

यावेळी बसवंत आप्पा उबाळे, यु .डी.गायकवाड, बालाजी कांबळे, रघुनाथ बनसोडे, नरसिंग घोडके, विकास कांबळे, अशोक देडे, दिवेकर सर,नारायण कांबळे, पिराजी साठे, अंगद वाघमारे,नागनाथ डोंगरे ,आनंद वैरागे आदी विविध संघटनांचे प्रमुख उपस्थित होते.

# राज्यपालांच्या हस्ते चिंतनातील क्रांतीसूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर या पुस्तकाचे शानदार प्रकाशन



ब्रह्म मुंबई / के. एच. हनवते :-

रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट बार्टी पुणे, बार कौन्सिल महाराष्ट्र अँड गोवा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल रिसर्च सेंटर मुंबई विद्यापीठ आणि अधिवक्ता परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर अ ज्यूरिस्ट या कार्यक्रमात दिनांक ०९.०९.२०२३ रोजी महाराष्ट्राचे राज्यपाल सन्माननीय श्री रमेश बैस, प्रा. डॉ. रवींद्र कुलकर्णी – कुलगुरू मुंबई विद्यापीठ, अँड. देवेंद्र उपाध्याय – मुख्य न्यायाधीश मुंबई उच्च न्यायालय, श्री सुनील वारे – महासंचालक बार्टी पुणे, यांच्या शुभ हस्ते आज चिंतनातील क्रांतीसूर्य: डॉ. बाबासाहेब आंबेडकर – लेखक प्रा. डॉ. बळीराम गायकवाड लिखित सहाव्या पुस्तकाचे प्रकाशन पार पडले.

मुंबई विद्यापीठाचे माजी कुलसचिव आणि कोकण ज्ञानपीठ महाविद्यालय उरण चे प्राचार्य डॉ. बळीराम गायकवाड यांनी संपादित केलेला अत्यंत महत्त्वपूर्ण ग्रंथ आहे. १९६ पृष्ठांचा जनाई प्रकाशन मुंबई द्वारे प्रकाशित केल्या जाणारा हा मौल्यवान ग्रंथ 'भारतीय दलित आणि आफ्रिकन–अमेरिकन समुदायांच्या कल्याणासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवरील लढ्याच्या अग्रगण्य आणि अमेरिकेत असताना ज्यांच्या सहवासात ' फुले, शाहू, बाबासाहेब आंबेडकर आणि अण्णा भाऊ साठे' अशा महापुरुषांच्या साहित्याकडे पाहण्याची वेगळी दृष्टी मिळाली त्या डॉ. गायकवाड यांच्या गुरू प्रा. डॉ. फे. हॅरिसन, इलिनॉइस युनिव्हर्सिटी अमेरिका, यांना हा ग्रंथ समर्पित केला आहे. डॉ. जयसिंगराव पवार, ज्येष्ठ विचारवंत ज. वी. पवार, संवेदनशील लेखक योगीराज बागुल, डॉ. सूर्यकांत कापशिकर, विजय गायकवाड, डॉ. भारत पाटणकर, डॉ. मांतेश हिरेमठ, श्री रवींद्र गोळे, डॉ. श्रीपाल सबनीस, अमित इंदुरकर, डॉ. उषा कांबळे, डॉ. आनंद बल्लाळ, डॉ. सीमा मुसळे, अमित इंदुरकर याचबरोबर डॉ. संतोष राठोड यांनी इतिहासिक प्रेरणादायी कवितांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मांडण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला आहे.

### खासदार सुधाकर शृंगारे यांच्या हस्ते ६५ लक्ष रु.च्या विकासकामांचे भूमिपूजन

# येणाऱ्या काळात सुद्धा मतदारसंघातील विकासकामांसाठी भरीव निधी खेचूण आणणार :- खा.शृंगारे

लातूर :- लातूर लोकसभा मतदारसंघाचे लोकप्रिय खासदार सुधाकर शृंगारे यांच्या हस्ते काल दिनांक १० सप्टेंबर, २०२३ रोजी लातूर लोकसभा मतदारसंघातील चाकूर तालुक्यातील मौजे कलकोटी येथे पर्यटन विकास योजनेअंतर्गत गावातील बालाजी मंदिर सभागृहासाठी मंजूर असलेल्या ५०.०० लक्ष रु. च्या कामाचे आणि खासदार स्थानिक विकास निधी अंतर्गत मौजे चाकुर येथील नालंदा बौद्ध विहारच्या कामासाठी मंजूर असलेल्या १५.०० लक्ष रु.च्या कामाचे भूमिपूजन पार पडले याप्रसंगी खासदार सुधाकर शृंगारे हे बोलत होते.

या प्रसंगी बोलताना, मी जेंव्हापासून या लातूर लोकसभा मतदारसंघाचे संसदेमध्ये प्रतिनिधित्व करत आहे तेंव्हापासून या मतदारसंघाचा विकास अतिशय वेगाने होत असून आज मतदारसंघात विविध ठिकाणी जलजीवन मिशनची कामे सुरु असून यामाध्यमातून प्रत्येक घराला शुद्ध पाण्याचे नळ कनेक्शन दिले जाणार आहे, तसेच मतदारसंघातील ग्रामीण भागांना जोडणाऱ्या विविध ग्रामीण मार्ग, इतर जिल्हा मार्ग आणि प्रमुख जिल्हा मार्गांचे कामे देखील अतिशय वेगवान पद्धतीने सुरु असून यामाध्यमातून ग्रामीण भागामध्ये दळणवळणाचे एक जाळे निर्माण होत असल्याचे लातूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार सुधाकर शृंगारे यांनी सांगितले.

देशामध्ये सध्या सुरु असलेल्या जी–२० परिषदेच्या माध्यमातून सध्या सगळे जग भारताची ताकद आणि वर्चस्व अनुभवत आहे. देशाचे पंतप्रधान आदरणीय श्री.नरेंद्र मोदी साहेबांच्या नेतृत्वाखाली



देश विकासाच्या दिशेने मार्गक्रमण करत असून आर्थिकदृष्ट्या देशाने गेल्या ९ वर्षात अतिशय उच्च अशी प्रगती करून देशाची अर्थव्यवस्था जगामध्ये ५ व्या क्रमांकावर आदरणीय नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालीच झेपावलेली आहे. गेल्या ९ वर्षाच्या कालखंडात कलम ३७०, राम मंदिर, तीन तलाक, नवीन संसदेचे बांधकाम, शेतकरी किसान सन्मान निधी योजना, उज्वला गॅस योजना यांसारख्या अनेक महत्त्वकांक्षी योजना सुरु करून देशातील सर्वसामान्य नागरिकास डोळ्यासमोर ठेऊन ते देशाचा कारभार करत असल्याचेही लातूर लोकसभा मतदार संघाचे खासदार शसुधाकर शृंगारे यांनी सांगितले.

याप्रसंगी अहमदपूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बाबासाहेब पाटील, राज्याचे माजी मंत्री तथा अहमदपूर विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार विनायकराव पाटील, माजी आमदार बब्रुवान खंदाडे , चाकूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती निळकंठ मीरकले, चाकूर चे नगराध्यक्ष कपिल जी माकणे, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष बालाजी पाटील चाकूरकर, तालुकाध्यक्ष शिवाजी बैणगिरे, माजी नगराध्यक्ष मिलिंद महालिंगे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती श्री.अशोकदादा चिंते, अभिमन्यू धोंडगे, सरपंच परमेश्वर कांबळे, प्रशांत पाटील. विवेकानंद शिंदे, गंगाधर आप्पा, दयानंदराव सुरवसे, श्रीनाथ जी सावंत, लक्ष्मन तिकिटे, हनुमंत भोसले, गणपतराव नितळे महाराज, मधुकरराव कांबळे, सुर्यकांत भिसे, राम कसबे, विलास महालींगे, नागसेन महालींगे, सिद्धेश्वर पवार, दिपक महालींगे यांच्यासह नागरिक, भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते व पत्रकार बांधव उपस्थित होते.

# मराठा आरक्षणाचा प्रश्न सरकारने सोडवावा

### आमदार धिरज देशमुख यांची मागणी; उपोषणस्थळी जावून आदित्य देशमुख यांची घेतली भेट

लातूर : मराठा आरक्षणासाठी लातूर येथील तहसील कार्यालयासमोर मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने उपोषण करीत असलेले आदित्य अप्पासाहेब देशमुख या तरुणाची लातूर ग्रामीणचे आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी सोमवारी भेट घेतली व त्यांच्या मागणीला जाहीर पाठिंबा दिला.

जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी या गावामध्ये मनोज जरांगे पाटील यांचे मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलन सुरू आहे. त्याप्रमाणे राज्याच्या वेगवेगळ्या भागात तरुण उपोषणाला बसले आहेत. लातूर येथेही गेल्या आठवडाभरापासून आदित्य अप्पासाहेब देशमुख




यांचे उपोषण सुरू आहे. तब्येत खालावली असल्याने सध्या त्यांच्यावर सलाईन लावून उपचार केले जात आहेत.

आमदार धिरज देशमुख यांनी उपोषणस्थळी जावून श्री. आदित्य देशमुख यांची भेट घेतली. त्यांच्या तब्येतीचीही आवर्जून विचारपूस केली. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी राज्यात अनेक तरुण उपोषण करीत आहेत. त्यामुळे सरकारने इतर समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा आरक्षणाचा प्रश्न संवेदनशीलतेने हाताळत तो त्वरित मार्गी लावावा, अशी भावना आमदार धिरज देशमुख यांनी व्यक्त केली.

यावेळी ट्वेन्टीवन शुगर्सचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, विलास सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन रविंद्र काळे यांच्यासह समाजबांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# तेल्ली गली येथील पाणीपुरवठा मंगळवारी सुरळीत होईल

लातूर :- लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने शहरातील पाणीपुरवठा सुरळीतपणे चालू असताना गाव भागातील तेली गल्ली येथील पाणीपुरवठा सोमवारी नांदगाव वेस येथील हनुमान मंदिर समोर पाईपलाईन फुटल्यामुळे बंद करण्यात आला. त्या पाईपलाईनचे काम चालू असल्यामुळे सोमवारी येणारे पाणी मंगळवारी येईल अशी माहिती लातूर शहर महानगरपालिकेचे पाणीपुरवठा कार्यकारी अभियंता विजयकुमार चव्हाण यांनी माहिती दिली आहे. याची नागरिकांनी नोंद घ्यावी.

# धनगरवाड्यांच्या उन्नतीसाठी विकासनिधी उपलब्ध करुन देणार- आ. शेखर निकम

पुणे / प्रतिनिधी: चिपळूण तालुक्यातील पुणेस्थीत धनगर समाजाने पुणे कर्वे नगर या ठिकाणी दि.१० सप्टेंबर २०२३ रोजी चिपळूण – संगमेश्वर विधानसभा मतदारसंघाचे आमदार शेखर निकम यांच्या प्रमुख उपस्थितीत मेळाव्याचे आयोजन केले होते या मेळाव्याला चिपळूण तालुक्यातील पुणे या ठिकाणी राहणा–या चाकरमान्यांनी भरभरून प्रतिसाद देत प्रचंड गर्दी करत कार्यक्रम यशस्वी केला. चिपळूण तालुक्यातील धनगरवाड्यांच्या दुर्लक्षीत विकासासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यात यावा तसेच चिपळूण तालुक्यातील डोंगररांगांत राहणा–या धनगर बांधवांसी रस्ते आणि पाणी या मुलभूत गरजा पुर्ण कराव्यात या मागण्या प्रामुख्याने मांडण्यात आल्या त्यासाठी आमदार शेखर निकम यांनी राज्य सरकारच्या पातळींवर विशेष प्रयत्न करावेत अशी मागणी या कार्यक्रमागरम्यान धनगर बांधवांकडून करण्यात आली तर पेढांबे, गाणे, खडपोली, शिरगांव , ओवळी, नांदीवसे, कुंभार्ली, कोळकेवाडी आदी वाड्यांसह इतर धनगरवाड्या दर्जेदार रस्त्यांनी जोडण्यात याव्यात अशी मागणी यावेळी करण्यात आली यावेळी या धनगरवाड्यांचा पाण्याचा प्रश्न ही निकाली काढून कायमस्वरुपी योजना करण्याची मागणीही करण्यात आली. मेळाव्या दरम्यान धनगर समाजाने केलेल्या मागणीला प्रतिसाद देत आमदार शेखर निकम यांनी ग्वाही देत चिपळूण तालुक्यातील धनगरवाड्यांसाठी निधी कमी पडू देणार नसून राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या माध्यमातून आवश्यक निधीसाठी विशेष प्रयत्न करुन सर्व धनगरवाड्या रस्त्यांना जोडणार असून पाण्याची समस्या सोडवण्यासाठी ही विशेष पाठपुरावा करणार असल्याची ग्वाही या कार्यक्रमात दिली. चिपळूण – संगमेश्वर विधानसभा मतदारसंघात २०१९ ला सदानंद चव्हाण आणि शेखर निकम यांच्यात थेट लढत होवून आमदार शेखर निकम यांनी २९ हजार २९७ मतांनी विजय प्राप्त केला होता सध्याच्या घडीला आमदार शेखर निकम यांनी आपल्या आमदार पदाच्या कार्यकाळात अनेक वाड्या वस्त्या पिंजून काढत आपले नेटवर्क तयार केले असून विकास कामांप्रती आमदार शेखर निकम यांचा संवेदनशील पणा कामा येत आहे. त्यांच्या माध्यमातून चिपळूण – संगमेश्वर विधानसभा मतदारसंघात अनेक विकासाची कामे होत असून




धनगरवाड्यांच्या विकासासाठी ही निधी उपलब्ध करुन घेण्यात त्यांना यश आले आहे. पुढील टप्प्यात राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या माध्यमातून धनगरवाड्यांच्या विकासासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन घेणार असल्याची ग्वाही दिल्याने धनगर समाजा बांधवांनी आमदार शेखर निकम यांना धन्यवाद देत त्यांच्या भूमिकेचे कौतुक केले. चिपळूण तालुका धनगर समाज मेळावा, पुणे आयोजित कार्यक्रमाला राष्ट्रवादी कॉंग्रेस चिपळूण – संगमेश्वर विधानसभा क्षेत्राध्यक्ष रमेश राणे, राष्ट्रवादी युवक तालुकाधक्ष निलेश कदम, खरी लोकजागृती चे संपादक संतोष येडगे, राष्ट्रवादी जिल्हा सरचिटणीस सुरेश खरात, राष्ट्रवादी जिल्हा चिटणीस अनंत कोकरे, राष्ट्रवादी तालुका उपाध्यक्ष रामचंद्र वरक, मिलन जंगम, परशूराम खरात, दत्ताराम बंगाल, सिकंदर चिपळूणकर, सुरेश गुरव, लक्ष्मण पवार, सिध्दार्थ निकम, महेश शिंदे, विलास खरात, नरेश हिरवे, प्रशांत येडगे, मधूकर जानकर, पांडूरंग खरात, अशोक बुरटे, मंगेश कोकरे, भगवान शिंदे, सुनिल कोकरे, रुपाजी गोरे, संतोष ( बाबू ) येडगे, संतोष वरक, प्रशांत येडगे, सुनिल येडगे, प्रकाश खरात, संतोष गोरे, राहूल शिंगाडे, बाबू खरात, काशीनाथ गोरे, दिपक कोकरे आदी आणि बहुसंख्य इतर समाजबांधव उपस्थित होते.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE